MADC

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम)
दूरध्वनीः ०२२–४९२१ २१२१ • फॅक्सः ०२२-२२१६ ३८१४
CIN : U45203MH2002SGC136979

म.वि.वि.कं./२०२६/प्रशा/ 805 . दिनांक :- ०४.०८.२०२६

# कार्यालयीन नोटीस

**विषयः महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या., मुंबई मुख्यालयातील कुरियर सर्व्हिस सेवा उपलब्ध करुन देणाऱ्या पुरवठादारांकडून दरपत्रके सादर करणेबाबत.**

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या.. मुंबई मुख्यालयातील कार्यालयासाठी आवश्यक असणाऱ्या कुरिअर सर्व्हिस कामासाठी खालील अटी शर्तीस अधिन राहून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

- **अटी व शर्ती:**

१. सेवा पुरविण्यासाठीचा दर (जीएसटी) दरासह सादर करावा (एकत्रित दर).

२. कामकाज कालावधी एक वर्ष (दिनांक ०१.०९.२०२६ ते ३१.०८.२०२७) कालावधीचा असेल.

३. कुरिअर घेवून जाण्या-येण्यासाठीचे शुल्क त्या ठिकाण्याच्या अंतरावर (कि.मी.) अवलंबून असावे.

४. स्थानिक, राज्यांतर्गत व देशांतर्गत कुरिअरसाठी दर सादर करावे.

५. कुरियर च्या वजनानुसार दरांचा तपशिल, उदा.

- ० ते २५० ग्रॅम
- २५१ ते ५०० ग्रॅम
- ५०१ ग्रॅम ते १ किलो
- १ ते २ किलो
- प्रत्येक अतिरिक्त किलोसाठी दर

६. कुरिअर डिलिव्हरीसाठी लागणारा कालावधी

७. कुरिअर वजनाप्रमाणे त्याचे दर व अति महत्वाच्या कागद-पत्रांची पाठविणी करावयाची असल्यास त्यासाठी लागणारे दर सादर करावे.

८. प्रतिमहिना कुरिअर बिलासोबत ज्या-ज्या ठिकाणी कुरिअर डिलिव्हरी करण्यात आलेली आहे त्या सर्व ठिकाणांची सविस्तर यादी जोडावी.

*** सदर यादीमध्ये खालील तपशील असणे आवश्यक आहे.**

- पाठविण्यात आलेल्या ठिकाणाचे नाव (शहर/गाव)
- पूर्ण पत्ता
- वजन (ग्रॅम/किलो)
- कुरिअरचा प्रकार (कागदपत्रे/ इतर साहित्य)
- पाठविण्याची तारीख
- डिलिव्हरीची तारीख
- प्रत्येक डिलिव्हरीसाठी आकारलेला दर

९. मागविण्यात आलेले दरपत्रक कोणतेही कारण न देता, रद्द करण्याचा अधिकार महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या., मुंबई यांना आहे.

वरील अटी शर्तीची पूर्तता करुन पुरवठादारांनी आपले दरपत्रक जीएसटी सहीत दिनांक **०४.०८.२०२६ ते १३.०८.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत या कार्यालयास सादर करण्यात यावे.**

PBhise 4/8/26

**कंपनी सचिव/ प्रभारी- प्रशासन**

प्रत माहितीस्तव :

१. मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, म.वि.वि.कं.मर्या., मुंबई